अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, दादर, मुंबई यांच्या न्यायालयात (न्यायालय क्र.५)

केस नंबर २०९२/Misc./२०२५

निशाणी १ वरील आदेश

प्रस्तुत केस मधील आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे तो उशीर माफ करण्यात यावा व आरोपीविरूध्द कलम १८(१) लिगल मेट्रोलॉजी ॲक्ट सह रूल १८ (१) लिगल मेट्रोलॉजी (पॅकेज्ड कमॉडीटीज) रूल सह कलम ३६ (१) लिगल मेट्रोलॉजी ॲक्ट प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आलेली आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार यांनी त्यांच्या नियमित पदभाराव्यतीरिक्त अतिरिक्त पदभार त्यांच्याकडे होता असे दोषारोपपत्र दाखल करण्यास उशिर होण्याचे कारण नमुद केलेले आहे. त्यामुळे सदरहू परिस्थीतीचा विचार करता अर्जदार यांना केस दाखल करण्यास केवळ ०६ दिवसांचा उशिर झालेला असल्यामुळे सदरहू उशिर माफ करून अर्जदार दाखल करत असणारे दोषारोपपत्र स्विकारण्यात यावे.

सदरहु हुकूमाची अभियोग पक्षाने नोंद घ्यावी.

(न्यायालयासमोर घोषीत केले)

दिनांक २०.०७.२०२६

(अ.अ.मेहेंदळे) 20/7/2026.
अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी,
५ वे न्यायालय, दादर, मुंबई.